## <u>रे. दि. मु. नं.१३९/२००२ मधील निशाणी २१२ वरील आदेश</u>

(मालन दिनकर कुंभार वगैरे विाा पोपट केसू कुंभार वगैरे)

प्रस्तुतचा अर्ज वादींनी प्रतिवादी क्र.५ वैजयंता तात्याबा कुंभार हिचे कायदेशीर वारस अभिलेखावर घेणेकरीता केलेला आहे.

०२. वादींचे अर्जातील कथनानुसार, प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी क्र.५ वैजयंता तात्याबा कुंभार ही दिनांक २७.०१.२०२२ रोजी मयत झाली आहे. प्रतिवादी क्र.५ हिचे वारसांना सदर दाव्याचे कामी प्रतिवादी करणे गरजेचे व न्यायाचे झाले आहे. प्रतिवादी क्र.५ हिला चतुरा जयसिंग कुंभार, गणपत तात्याबा कुंभार, संपत तात्याबा कुंभार व सिंदू प्रल्हाद कुंभार असे कायदेशीर वारस आहेत. सबब, प्रतिवादी क्र.५ हिचे वारस अभिलेखावर घेण्यास व तशी दाव्यामध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी मिळणेबाबत विनंती केली आहे.

०३. प्रतिवादी क्र.७ ने म्हणणे देवून प्रस्तुत अर्जास हरकत घेतली आहे. सदरच्या अर्जामध्ये प्रतिवादी क्र.५ड चे वय नमुद नाही. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजुर करावा. यदाकदाचित अर्ज मंजुर केलेस रक्कम रुपये ५०००/– कॉस्ट करावी, अशी विनंती केली आहे. प्रतिवादी क्र.१ व ३ यांनी प्रतिवादी क्र.७ चे म्हणण्यास पुष्टी देवून अर्जास हरकत घेतली आहे.

०४. प्रस्तूत अर्ज व म्हणणे वाचले. वादी व प्रतिवादीतर्फे विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले. वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादीविरुध्द वाटपासाठी व जाहीर ठराव, वाटप व कायमचे ताकीदीसाठी दाखल केला आहे. वादींनी प्रतिवादी क्र.५ वैजयंता तात्याबा कुंभार हिचे मृत्यू प्रमाणपत्राची मूळ प्रत निशाणी २१८ वर दाखल केली आहे. सदर मृत्यू उता–याचे अवलोकन केले असता प्रथमदर्शनी, प्रतिवादी क्र.५ हिचा मृत्यू दिनांक २७.०१.२०२२ रोजी झालेचे दिसून येत आहे. प्रस्तुत दाव्याच्या स्वरुपाचा विचार करता दाव्यामध्ये सर्व आवश्यक पक्षकार सामील करुन घेणे गरजेचे आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८, आदेश २२ क्रम ४ चा विचार करता जर प्रतिवादी याचा मृत्यू झाला तर त्याचे वारसांच्या विरुध्द दावा करण्याचा अधिकार वादीला टिकून राहिला तर प्रतिवादीच्या कायदेशीर वारसांना पक्षकार करणे गरजेचे आहे. प्रस्तुत दाव्याचे स्वरुप पाहता दावा मिळकतीबाबत प्रतिवादीचे वारसांविरुध्द दावा करण्याचा अधिकार वादीला आहे, असे दिसून येत आहे. प्रस्तुतचा अर्जात वादीने कथन केलेप्रमाणे चतुरा जयसिंग कुंभार, गणपत तात्याबा कुंभार, संपत तात्याबा कुंभार व सिंदू प्रल्हाद कुंभार हे प्रतिवादी क्र.५ हिचे वारस असलेबाबत प्रथमदर्शनी दिसून येत आहे. प्रस्तुतचा दावा गुणदोषांवर निकाली काढण्यासाठी प्रतिवादी क्र.५ चे कायदेशीर वारसांना प्रतिवादी म्हणून सामील करुन घेणे न्यायोचित दिसून

येत आहे. सदरचा अर्ज नामंजूर झाल्यास यातील वादी व प्रतिवादी तसेच न्यायालयाच्या वेळेचा अपव्यव होणार आहे. यासर्व बाबींचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश–

## **आदेश**

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. वादींनी अर्जात नमुद केलेप्रमाणे मयत प्रतिवादी क्र.५ वैजयंता तात्याबा कुंभार हिचे वारस त्यांच्या योग्य ती नांवे व वयांसह अभिलेखावर घेवून तशी दुरुस्ती १४ दिवसांचे आत करावी. तसेच, दुरुस्त दाव्याची प्रत व आवश्यक प्रती तात्काळ सादर कराव्यात.

Digitally signed by Chetna Yashwant Neware
Date: 2023.01.24 15:23:19 +0530

दि.१९.०१.२०२३ (सी.वाय.नेवारे)
पाटण, जिल्हा सातारा. सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पाटण.